ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७३ /२०२६ दि. २३ /०१/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, ठाणेनगर वाहतूक उपविभागाचे हद्दीत ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक–२०२६ च्या अनुषंगाने ठाणा बेडेकर कॉलेज येथे स्ट्रॉंग रूम असून, सदर ठिकाणावरून दि.१४/०१/२०२६ रोजी मतपेटी वाटप व दि.१५/०१/२०२६ रोजी ठाणा कॉलेज येथे मतपेटया जमा व दि.१६/०१/२०२६ रोजी निवडणूक मतमोजणी होणार आहे. सदर परिसरातील वाहतुक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे:–

प्रवेश बंद –	**१)** कळवा येथून येणारी वाहने क्रिकनाका कडून ठाणे रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या सर्व टी.एम.टी./एन.एम.एम.टी/खाजगी बसेस व मालवाहु टेम्पो व इतर मालवाहतक करणारी वाहने यांना **क्रिकनाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	**अ)** टी.एम.टी./एन.एम.एम.टी./खाजगी बसेस या प्रवासी यांना क्रिकनाका येथे उतरवून तेथूनच टी.एम.टी./एन.एम.एम.टी./खाजगी बसेस इच्छित स्थळी जातील. **ब)** मालवाहु टेम्पो व इतर मालवाहतक करणारी वाहने ही क्रिकनाका येथुन साकेत मार्गे इच्छित स्थळी जातील.
पार्किंग मनाई –	**दादाजी कोंडदेव स्टेडिअम ते ठाणे रेल्वे स्टेशन कडे जाणारे रोडचे परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजुस वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.** **(दि.१६/०१/२०२६ रोजी सकाळी ०७:०० वा. ते सायंकाळी १७:०० वा. पावेतो)**

सदर अधिसूचना ही **दि.१४/०१/२०२६ रोजी सकाळी ०७:०० वा. दुपारी १४:०० वा पावेतो, दि.१५/०१/२०२६ रोजी सायंकाळी १७:०० वा ते रात्रौ २४:०० वा. पावेतो** तसेच **दि.१६/०१/२०२६ रोजी सकाळी ०७:०० वा. ते सायंकाळी १६:०० वा. पावेतो** अमंलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ ठाणे वाहतूक विभाग व पो नि. नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी वाहतूक उपविभाग, ठाणे शहर